# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि – ४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनीयम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

विशेष मागासवर्ग कक्ष

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५ फोन नं. ०७१३२ - २१६५९६

जावक क्रमांक : गो.वि./वि.मा.क.847/२०२५ दिनांक- २३/०९/२०२५

## परिपत्रक

प्रति,

**मा. अध्यक्ष /सचिव /प्राचार्य/प्राचार्या**
**सर्व संलग्नित विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालये,**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**विषय : कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांच्या बिंदुनामावली तपासणीबाबत.**

**संदर्भ:- १. सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-संकीर्ण २०२२ /प्र.क्र. ई.१०६२९१८ /आरक्षण-३, दि. ११ जुन ,२०२५**
**२. विभागीय आयुक्त, (मागासवर्ग कक्ष )नागपुर विभाग, नागपुर यांचे पत्र क्र. मावक /अका/-२ /कावि-५२१/२०२५,दिनांक ०८ ऑगष्ट, २०२५**

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये संदर्भाकित पत्रांच्या अनुषंगाने गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. ११/०४/२०२२ च्या शासन निर्णयानुसार विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालयांची अध्यापक संवर्गातील समान वेतन श्रेणीच्या पदांची एकत्रित बिंदुनामावली तपासणी करण्या संदर्भात पुढील प्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्याअनुषंगाणे सामान्य प्रशासन विभाग १६- ब मंत्रालय मुंबई यांचे मार्गदर्शनानुसार विधि व न्याय विभागाने तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांना आरक्षण अधिनियम २००१ मधिल तरतुदी लागु राहणार नाहीत. तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक. २४/०६/२०२२ रोजीच्या पत्रामध्ये विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांच्या अनुषंगाने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम २०२१ मधिल तरतुदीनुसार स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे. सदर पत्रामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम २०२१ मधिल तरतुदीनुसार सदर संवर्गनिहाय आरक्षण ज्या संस्थांना राज्य शासनाकडुन प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अनुदान मिळते अशा शैक्षणिक संस्थांना लागु असल्याने विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित संस्थांना सदर आरक्षण धोरणातील तरतुदी लागु होणार नाहीत असे नमुद केले आहे.

त्यामुळे विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांना पदभरतीसाठी आरक्षण लागु राहणार नाही. याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**सहपत्र:- संदर्भाकिंत १ व २ चे पत्र**

( डॉ. अनिल हिरेखण )
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी माहितीस स विनय सादर -**

१. मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
२ मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
३.मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

Scanned with OKEN Scanner

247-8

**महाराष्ट्र शासन**

**विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालय (मागासवर्ग कक्ष)**
**जुने सचिवालय,सिव्हिल लाईन्स, नागपूर-१**
**Email:-divcombccellngp@gmail.com** **दुरध्वनी क्र.०७१२-२५६१६३०**

---

क्रमांक/मावक/अका-२/कावि-521/२०२५ दिनांक 08 ऑगस्ट, २०२५

आवक क्र. 782 दि. 26/8/25
जावक क्र. ............ दि. ............

प्रति,

१) कुलसचिव,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर.

२) कुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

३) कुलसचिव,
कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक जि. नागपूर.

विषय :- कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांच्या बिंदूनामावली तपासणीबाबत.

संदर्भ :- मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०२२ / प्र.क्र. ई-१०६२९१८ / आरक्षण-३, दिनांक ११ जुन, २०२५.

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक ११/०४/२०२२ च्या शासन निर्णयानुसार अनुदानित / विनाअनुदानित महाविद्यालयांची अध्यापक संवर्गातील समान वेतनश्रेणीच्या पदांची एकत्रित बिंदुनामावली तपासणी करावी अशी धारणा व्यक्त करून ती पक्की करण्याबाबत विनंती केलेली होती.

त्याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग १६-ब, मंत्रालय मुंबई यांचे मार्गदर्शन प्राप्त झालेले असुन पत्रात नमूद विधि व न्याय विभागाने तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिलेल्या अभिप्रायांनुसार विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांना आरक्षण अधिनियम २००१ मधील तरतूदी लागु राहणार नाहीत. तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक २४/०६/२०२२ रोजीच्या पत्रामध्ये विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांच्या अनुषंगाने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम २०२१ मधील तरतूदींबाबत स्पष्टीकरण देण्यात आले आहे. सदर पत्रामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था ( अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम २०२१ मधील तरतुदीनुसार सदर संवर्गनिहाय आरक्षण ज्या संस्थांना

2101

आ-वि-क- 26/8/2025

Scanned with OKEN Scanner

राज्य शासनाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अनुदान मिळते अशा शैक्षणिक संस्थांना लागु असल्याने विनाअनुदा. कायम विनाअनुदानित संस्थांना सदर आरक्षण धोरणातील तरतुदी लागु होणार नाहीत, असे नमूद केले आहे.

विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांना पदभरतीसाठी आरक्षण लागु राहणार नसल्याचे पत्राव्दारे या कार्यालयास कळविलेले आहे, करीता सदर मार्गदर्शन उचित कार्यवाहीस्तव आपणाकडे पाठविण्यात येत असुन, अधिनस्थ असलेल्या विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे.

सहपत्र :- संदर्भिय पत्राची प्रत.

(इर्क्सि चौधरी)
सहाय्यक आयुक्त (मावक)
नागपूर विभाग, नागपूर.

प्रतिलीपी :- मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई — ३२ यांना सविनय सादर.

सहाय्यक आयुक्त (मावक)
नागपूर विभाग, नागपूर.



Scanned with OKEN Scanner

E-8486845

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-३२.**

ई-मेलद्वारे

क्रमांक:- संकीर्ण-२०२२/प्र.क्र.ई-१०६२९१८/आरक्षण-३ दिनांक : ११ जून, २०२५.

प्रति,

सहायक आयुक्त (मावक),
विभागीय आयुक्त कार्यालय,
नागपूर.

विषय:- कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांच्या बिंदूनामावली तपासणीबाबत.

संदर्भ :- आपले क्र. मावक/अका-१/कावि-५२/२०२५, दि. २४/०१/२०२५ चे पत्र.

आपल्या संदर्भाधीन पत्रान्वये आपण उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. ११/०४/२०२२ च्या शासन निर्णयानुसार अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालयांची अध्यापक संवर्गातील समान वेतनश्रेणीच्या पदांची एकत्रित बिंदूनामावली तपासणी करावी अशी धारणा व्यक्त केली असून सदर धारणा पक्की करण्याची विनंती केली आहे.

२. त्यानुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, विधि व न्याय विभागाने तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिलेल्या अभिप्रायांनुसार विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांना आरक्षण अधिनियम, २००१ मधील तरतूदी लागू राहणार नाहीत. तसेच, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. २४/०६/२०२२ रोजीच्या पत्रामध्ये विना अनुदानित/कायम विना अनुदानित शैक्षणिक संस्थांच्या अनुषंगाने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ मधील तरतुदींबाबत स्पष्टीकरण देण्यात आले आहे. सदर पत्रामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाने "महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ मधील तरतुदीनुसार सदर संवर्गनिहाय आरक्षण ज्या संस्थांना राज्य शासनाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अनुदान मिळते अशा शैक्षणिक संस्थांना लागू असल्याने विना अनुदानित/कायम विना अनुदानित संस्थांना सदर आरक्षण धोरणातील तरतुदी लागू होणार नाहीत." असे नमूद केले आहे.

३. उपरोक्त बाबी विचारात घेता, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांना पदभरतीसाठी आरक्षण लागू राहणार नसल्याने आपण संदर्भाधीन पत्रान्वये व्यक्त केलेली अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांची बिंदूनामावली विषयनिहाय एकत्रित तपासणी करण्याबाबतची धारणा योग्य नसून ती पक्की करता येणार नाही.

11/06/2025

पत्र निर्गमित

(अ.म.घेमटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

Scanned with OKEN Scanner